: प्रकरण चौथे :

# भारतीय स्त्रियांत राजकीय प्रतिनिधित्व वाढविण्यासंबंधीच्या उपाययोजना व शिफारशी

: प्रकरण 4 थे :

# भारतीय स्त्रियांत राजकीय प्रतिनिधीत्व वाढविण्यासंबंधीच्या उपाययोजना व शिफारशी

भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीला 50 वर्षे होऊन गेली तरी आजपर्यंत संसदेत आठ टक्याहून अधिक प्रतिनिधीत्व महिलांना मिळालेले नाही. तेव्हा पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना राजकारणात सहभागी करून घेणे गरजेचे वाटते. प्रस्तुत प्रकरणात स्त्रियांचे राजकीय प्रतिनिधित्व वाढविण्यासंबंधी कोणकोणते घटक कारणीभूत आहेत, तसेच आतापर्यंत कोणते प्रयत्न झालेले आहेत आणि भविष्यकाळात कोणत्या उपाययोजना करणे गरजेचे आहे याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. भारतीय राजकारणात स्त्रियांचा सहभाग कमी होण्यामागे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक घटक कारणीभूत आहेत. तेव्हा या दृष्टीकोणातून एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात झालेल्या प्रयत्नाचा धावता आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच शासकीय पातळीवरून झालेल्या उपाययोजनांचा येथे परामर्श घेण्यात आलेला आहे.

राजकीय प्रतिनिधित्व लोकशाही प्रक्रियेमध्ये राजकीय सहभागाचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो पण लोकशाही व्यवस्थेत समानतेच्या दृष्टीकोणातून मतदानाचा अधिकार हा राजकीय सहभागाचा पहिला घटक मानला जातो. इतिहासकालीन घटनांतून आपल्याला असे अनेक पुरावे मिळतात. ज्या मध्ये स्त्रियांना अनेक क्षेत्रांपासून वंचित ठेवले गेले, त्याचप्रमाणे मतदानाचा हक्कही त्यांना नाकारला गेला.

18 व्या शतकांपर्यत जगातील कोणत्याही राष्ट्रात स्त्रियांना कायदेशीरदृष्टया राजकीय अधिकार प्राप्त झालेला नव्हता. अगदी 19 व्या शतकाच्या सुरवातीला स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. इंग्लंडमध्ये सफ्रेजिस्ट चळवळीमुळे स्त्रियांना समान हक्क प्राप्त झाले. [1] स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने मताचा हक्क मिळावा म्हणून स्त्रियांनी लढाऊ वृत्तीने सफ्रेजिस्ट चळवळ सुरू केली. 1860 साली सुरू झालेली ही सफ्रेजिस्ट चळवह 1903 साली आक्रमक वृत्तीने व जोमाने प्रयत्न करू लागली. दरम्यान स्त्रियांना राजकीय समानता मिळावी आणि स्त्रियांना मताधिकार मिळावा म्हणून सात विधेयके पार्लमेंट मध्ये

मांडण्यांत आली. परंतु ही विधेयके फेटाळण्यात आली. 1905 ते 1913 या काळात `सिल्हिया पॅंरवर्स्ट` हिच्या नेतृत्त्वाखाली सफ्रेजिस्ट चळवळ सुरू झाली. स्त्रियांना मताधिकार मिळावा हा प्रश्न एक ज्वलंत राजकीय प्रश्न बनला. लढाऊ वृत्तीने मोर्चे काढून सार्वजनिक व खासगी मालमत्तेची नासधूस करून स्त्रियांनी आपले आंदोलन अगदी आक्रमक व उग्र बनविले होते. 1917 साली स्पिकर्स कॉन्फरन्सने एकमताने स्त्रियांच्या मताधिकारास अनुकूल पाऊल उचलले. त्यामुळे सफ्रेजिस्टांनी आपली चळवळ मागे घेतली. 1918 मध्ये पीपल्स ॲक्ट मंजूर झाला आणि वयाची 20 वर्षे पूर्ण असणाऱ्या स्त्रियांना मताधिकार मिळाला. पुढे 1928 साली स्त्रियांना संपूर्णत: पुरूषांच्या बरोबरीने पार्लमेंट आणि स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये मताधिकार प्राप्त झाला. संसदीय लोकशाहीची जननी असणाऱ्या इंग्लंडमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त करण्यासाठी सफ्रजिस्ट चळवळ उभी करावी लागली.

भारतात 1919 च्या मॉंटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानुसार स्त्रियांना मतदानाचा राजकीय हक्क देण्यात आला. [2] पुढे 1935 च्या कायद्याने या अधिकाराला अधिक बळकटी आली. 1947 साली भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि 1950 च्या भारतीय राज्यघटनेच्या कायदेशीर तरतुदीनुसार स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने मतदानाचा आणि निवडणूक लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला. ब्रिटिश स्त्रियांप्रमाणे भारतीय स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त करण्यासाठी सफ्रेजिस्ट चळवळ उभी करावी लागली नाही. कायद्यानुसार स्त्रियांना सनदशीर मार्गाने राज्यकारभारात सहभागी होण्याची समान संधी प्राप्त झाली.

राजकारणात स्त्रियांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीकोणातून विचार केल्यास भारतीय स्त्री जवळ जवळ सर्वच क्षेत्रांत दुय्यम मानली जात असे. स्त्रियांवर असलेल्या सामाजिक आणि आर्थिक बंधनामुळे स्त्रिया सार्वजनिक क्षेत्रांत पुढे येऊ शकल्या नाहीत हे स्पष्ट झाले होते, त्यातूनही स्त्रियांच्या उन्नतीसाठी भारतात 19 व्या आणि 20 व्या शतकात समाजसुधारकांनी आणि राजकीय नेत्यांनी जे प्रयत्न केले ते बहुमोलाचे मानावे लागतील. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांत स्त्रियांची जी अधोगती झाली त्यासंबंधीची जाणीव आणि जागृती स्त्रियांत होण्यासाठी समाजसुधारकांनी समाजसुधारणेचे विविध प्रयत्न केले. स्त्रियांना शिक्षण देणे, अनिष्ट प्रथा, परंपरा यांचे निर्मुलन करणे, त्यांच्यावरील अन्याय, जुलूम थांबविणे, त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनविणे, त्यांचा राजकीय सहभाग वाढविणे, असे प्रयत्न

समाजसुधारकांनी आणि विविध संघटनांनी केलेले आहेत. त्यांचा येथे थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे.

भारतात स्त्रीशिक्षणाच्या आणि स्त्री सुधारणेच्या कार्याची मुहुर्तमेढ रोवण्याचे प्रथम श्रेय राजाराममोहन रॉय आणि त्यानंतर पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांना द्यावे लागेल. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात संपूर्ण देशभर समाजसुधारणेची लाट उसळलेली होती. पंजाबमध्ये दयानंदसरस्वती, गुजराथेत दलपतराय, लक्ष्मीशंकर, उमियाशंकर, महाराष्ट्रात लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, न्या. महादेव गोविंद रानडे, पंडिता रमाबाई, गोपाळ गणेश आगरकर, जगन्नाथ शंकर शेठ, महात्मा जोतिबा फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाळ कृष्ण देवधर, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे इत्यादी समाजसुधारक मंडळींनी अन्यायी सामाजिक चालिरिती मोडून स्त्री शिक्षणाचा प्रसार करून समाजसुधारणेचे प्रयत्न केले. [3]

1854 साली सती बंदीचा कायदा , 1856 चा स्त्रियांना पुनर्विवाहाची मुभा देणारा कायदा आणि 1860 चा संमती वयाचा कायदा यांच्या निर्मितीचे श्रेय समाजसुधारकांना आणि शिक्षणमहर्षींना द्यावे लागेल. 1891 साली महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुणे येथे मुलींची शाळा सुरू करून स्त्री शिक्षणाच्या कार्याची सुरवात केली.[4] भारतातील मुलींची पहिली स्वतंत्र शाळा म्हणून तिचा उल्लेख करण्यात येतो. फुले यांच्याप्रमाणेच महाराष्ट्रात पंडिता रमाबाई, डॉ. आनंदी जोशी, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, मिस सोबराजी, काशीताई कानेटकर, आण्णासाहेब कर्वे, गो. ग. आगरकर, डॉ. रखमाबाई इत्यादी समाजसुधारक कार्यकर्त्यांनी स्त्री शिक्षणाच्या आणि सामाजिक सुधारणेच्या कार्याला वाहून घेतले. [5] दरम्यान स्वामी विवेकानंद यानीही भगिनी निवेदिता यांच्या मदतीने `बालिका सदन` संस्था स्थापन करून स्त्री-समाज सुधारणेचे कार्य सुरू केले. स्त्री -पुरूष असमानतेविषयी खंत व्यक्त करताना ते म्हणत, ``स्त्री आणि पुरूष हे समाजपक्षाचे दोन पंख आहेत, एका पंखाने पक्षी उडणे शक्य नाही, तद्वतच एकाच्याच उन्नतीने समाज- पक्षी आदर्श जीवनाकडे झेपावू शकणे कालत्रयी शक्य नाही, स्त्रियांच्या उन्नतीची हेळसांड करणे हेच आमच्या आजच्या अध:पतीत हीन समाज स्थितीचे फार मोठे कारण आहे.`` [6]

मुंबई प्रांताबरोबरच देशातील इतर प्रांतातही स्त्री-शिक्षणाचे आणि स्त्री- समाजसुधारणेचे प्रयत्न झाले होते. पंजाबमध्ये लाला देवराज, बडोदा येथे आत्माराम पंडित आणि प्रयाग येथील महिला

विद्यापीठ तसेच डॉ. ॲनी बेझंट यांचे कार्य यातूनच स्त्री शिक्षण प्रसाराची प्रचिती येते. ॲनी बेझंट यांच्या शैक्षणिक कार्यातूनच 1927 साली अखिल भारतीय महिला परिषदेचा जन्म झाला. अखिल भारतीय महिला परिषदेने 1928 मध्ये हंटर कमिशनला श्रीमती सरोजिनी नायडू यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण योजना व शिफारशी सादर केल्या. या शिष्टमंडळात डॉ. ॲनी बेझंट, डॉ. मथ्थूलक्ष्मी रेड्डी, मिसेस पी. के. सेन, बेगम हमीदा अली, लेडी रस्तुमजी फर्दुनजी, अमृतकुंवर यांचा समावेश होता. स्त्रियांना स्थानिक स्वराज्य संस्थात प्रतिनिधीत्व मिळावे आणि स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढावा अशी शिफारस या शिष्टमंडळाने केली. स्त्रियांच्या शैक्षणिक व सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने 1937 मध्ये गांधीजीनी सुरू केलेल्या वर्धा योजनेचा येथे उल्लेख करणे योग्य ठरते.

**भारतातील विविध महिला संघटनाचे योगदान -**

भारतीय समाजात स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने समानतेची वागणूक मिळवून देण्यासाठी विविध महिला संघटनांनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे. स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी राजकीय निर्णय निर्धारण प्रक्रियेत त्यांना सहभागी करून घेण्यासाठी प्रथम त्यांचा आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारणे आवश्यक होते त्यासाठी विविध संघटना स्थापन करण्यात आल्या. स्त्रियांचा कनिष्ठ, दुय्यम दर्जा त्यांचे आर्थिक परावलंबन आणि अनिष्ट, अन्यायी प्रथा परंपरा यांचे निर्मूलन करण्याची महत्त्वाची कामगिरी पुढील संघटनानी पार पाडलेली आहे.

1) अखिल भारतीय महिला परिषद (1904)

2) अखिल भारतीय महिला परिषद (1910)

3) वुमेन्स इंडियन असोसिएशन (1917)

4) नॅशनल कौन्सिल ऑफ वुमेन इन इंडिया (1925)

5) ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्स (1917)

6) पंजाब वुमेन्स सेल्फ डिफेन्स लिग (1937)

7) बंगालची आत्मरक्षा समिती (1944)

8) कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट

9) आंध्र महिला संघम

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अखिल भारतीय महिला परिषदेचे कार्य थंडावले होते. वास्तविक महिलांच्या समस्या सोडविण्याचे एक स्वतंत्र व्यासपीठ या नात्याने या संस्थेचे कार्य अधिक जोमाने चालावयास पाहिजे होते. परंतु शासकीय ध्येयधोरणांना आणि योजनांना केवळ सहकार्य करणे एवढेच मर्यादित कार्य या परिषदेकडून होवू लागले. सहाजिकच अखिल भारतीय महिला परिषदेतील कार्यकर्त्या स्त्रिया विविध राजकीय पक्षाकडे आकर्षित झाल्या. वास्तविक स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर एक व्यापक आणि भक्कम स्वरूपाची महिला संघटना कार्यरत राहणे आवश्यक होते. दरम्यान 1945 साली एक जागतिक महिला परिषद भरविण्यात आली. या परिषदेत सर्व देशातील स्त्री संघटनानी एकत्र येवून `विमेन्स इंटरनॅशनल डेमोक्रॅटिक फेडरेशन` या नावाची संस्था स्थापन केली. भारतात 1954 साली कलकत्ता येथे भारतीय महिला फेडरेशनची स्थापना होवून ही संघटना जागतिक आंतरराष्ट्रीय महिला फेडरेशनला जोडण्यात आली. [7] अखिल भारतीय महिला फेडरेशनला संलग्न असणाऱ्या विविध महिला संघटना आणि शाखा संपूर्ण देशभर स्थापन झाल्या. अशा विविध स्त्री संघटनाची वर्गवारी पुढीलप्रमाणे करता येईल.

1) **प्रतिगामी स्त्री संघटना** - आर्य समाजाच्या महिला शाखा, तामिरे मिल्लत, विश्व हिंदू परिषदेची स्त्री शाखा, राष्ट्रसेविका समिती इत्यादी

2) **स्थितिवादी संघटना** - विविध लेडीज क्लब, विमेन्स कौन्सिल, यंग विमेन्स ख्रिश्चन असोसिएशन, ज्ञाती संघटनाच्या स्त्री शाखा इत्यादी.

3) **प्रागतिक स्त्री संघटना** - युनिर्व्हसिटी विमेन्स असोसिएशन, शहरातील स्त्री संस्था व महिला मंडळे इत्यादी.

4) **व्यावसायिक संघटना** - स्त्री उद्योजक, स्त्री लेखक, स्त्री डॉक्टर, स्त्री शास्त्रज्ञ, स्त्री वकील, स्त्री कलावंत इत्यादी.

5) **पुरोगामी संघटना** - समाजवादी महिला सभा, श्रमिक महिला संघ, महिला दक्षता समिती, वर्किंग विमेन्स असोसिएशन इत्यादी.

6) **स्त्रीवादी गट** - कानपुरचे नारीकेंद्र, बेंगलोरमधील विमेन्स व्हाईस, विमोचना, दिल्लीतील मानुषी, सहेली, मुंबईतील नारी अत्याचार विरोधी मंच इत्यादी.

वरील प्रमाणे स्त्री संघटनाची संक्षिप्त स्वरूपाची यादी देवून त्यांच्या सामाजिक कार्याची येथे नोंद घेतलेली आहे. या महिला संघटनांनी स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी प्रयत्न केला असला तरीही त्यांच्याकडून स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविण्यासंबंधीचे कार्य फारसे होवू शकले नाही. त्यामुळे देशात केवळ स्त्री संघटनांची आणि स्त्री गटाची संख्या वाढवून भागणार नाही, तर त्यांच्यात राजकीय जाणीव आणि जागृती निर्माण होणे गरजेचे आहे. स्त्रीसंघटनांनी स्त्रियांना राजकीय स्वरूपाचे ज्ञान दिले पाहिजे की जेणेकरून स्त्रियांना राजकारणात सहभागी होणे सुलभ होईल.

1975 पासून भारतात या स्त्री संघटना चळवळीला मोठया प्रमाणात सर्व पातळीवर चालना मिळाली, स्त्री संघटनांचे लक्ष किंवा उद्देश सामाजिक आणि आर्थिक न्याय प्राप्त करणे हा होता. त्या दृष्टीकोणातून अगदी तळागाळापासून स्त्री संघटना प्रस्थापित झालेल्या दिसतात. हा उद्देश सफल करीत असताना जरी राजकारणात सक्रीय सहभागी होण्यापासून अनेक कारणास्तव स्त्रिया वंचित राहिल्या असल्या तरी शासकीय रचनेवर निश्चितच आपले उद्देश साध्य करण्यासाठी हित संबंधी गटाच्या स्वरूपात दबाव आणण्यात काही प्रमाणात यशस्वी झालेल्या आहेत. तेव्हा आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण झालेल्या स्त्री विषयक चळवळीचा प्रभाव आणि राष्ट्रीय पातळीवर स्त्री संघटनाच्या वाढलेला दबाव यामुळे स्त्रियांच्या विकासासंबंधीची शासकीय धोरणे आणि कार्यक्रम राबविण्यात येऊ लागले.

स्त्रियांच्या विकाससंबंधीची शासकीय धोरणे आणि कार्यक्रम

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या उन्नतीसाठी शासनाकडून विविध योजना आणि कार्यक्रम राबविण्यात आले. भारतीय स्त्रियांची सामाजिक, आर्थिक स्थिती सुधारल्याशिवाय स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढणार नाही. याविषयी जाणीव आणि जागृती निर्माण झाल्यामुळे महिला संघटनांनी शासनावर दबाव आणला त्यामुळे शासनाकडून महिलांच्या विकाससंबंधी विविध योजना व कार्यक्रम राबविण्यात येवू लागले. स्त्रियांना समाजात पुरूषांच्या बरोबरीने सामाजिक व आर्थिक सामर्थ्य प्राप्त झाले की आपोआपच त्यांचा पुरूषांच्या बरोबरीने राजकीय सहभाग वाढेल अशी धारणा महिला संघटनांची झाल्यामुळे स्त्री चळवळीला अधिक जोर चढला. त्यामुळे शासनाला स्त्रियांच्या उन्नतीसंबंधी विविध योजना राबविणे भाग पडले.

<u>**पंचवार्षिक योजना**</u> -

आतापर्यंत झालेल्या आठ पंचवार्षिक योजनात (1951 ते 1997 ) मध्यवर्ती समाज कल्याण मंडळाने ( CSWB) स्त्रियांच्या सर्वांगिण विकासावर भर दिलेला आहे. स्त्रियांचा शैक्षणिक, आर्थिक, आरोग्यविषयक आणि रोजगारविषयक योजनांवर अधिक लक्ष केंद्रीत केलेले आहे. शासनाने स्त्रियांच्या विकास योजनांवर पहिल्या पंचवार्षिक योजनेत केवळ 4 कोटी रूपये खर्च केले होते, तर आठव्या योजनेत सुमारे 2000 कोटी रूपये खर्च केलेले दिसतात. महिला विषयक शासकीय योजना आणि कार्यक्रम राबविण्यासाठी शासनाने समाजाच्या तळापर्यंत महिलामंडळे स्थापण्याविषयी चालना दिलेली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासूनच ही महिला मंडळे संघटितरित्या कार्य करीत असलेली दिसतात त्यामुळे महिला कल्याणविषयक अंमलबजावणी सुलभपणे होवू लागलेली आहे. शासनाने स्त्रियांच्या उन्नतीबाबत विविध योजना सुरू केलेल्या आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ( 1986), राष्ट्रीय आरोग्य धोरण (1983), राष्ट्रीय लोकसंख्या धोरण (1993), राष्ट्रीय अन्न- पोषण धोरण (1993) अशी विविध धोरणे स्विकारून केंद्रशासनाने त्यासंबंधीच्या विविध योजना व कार्यक्रम राबविलेले आहेत. समाजाच्या सर्व क्षेत्रांत स्त्रियांचा सहभाग वाढविण्यावर तसेच समता, विकास आणि शांतता या ध्येयात अधिक जवळीक साधण्यावर केंद्रसरकारने पंचवार्षिक योजनात अधिक भर दिलेला आहे. [8] केंद्रसरकारच्या मानव संसाधन

विकास खात्याने महिला आणि बालविकास विभाग सुरू केल्यामुळे महिलाविषयक शासकीय ध्येयधोरणे राबविणे अधिक सोयीस्कर झालेले आहे.

भारत सरकारने महिलांच्या विकासासंबंधी पुढीलप्रमाणे विविध योजना आणि कार्यक्रम आयोजित केलेले आहेत.

1) महिलाविषयक राष्ट्रीय यथार्थ विकास योजना (1988)

2) महिला विषयक स्वयंरोजगार आणि अनौपचारिक विभाग विषयक राष्ट्रीय मंडळ (1988)

3) बालकन्या विषयक राष्ट्रीय योजना (1991- 2000)

4) द्रारिद्र्य निर्मुलन विषयक योजना

केंद्रसरकारने दारिद्र्य रेषेखालील स्त्रियांच्या आर्थिक विकासासंबंधी विविध योजना सुरू केलेल्या आहेत.

अ) महिला समृद्धी योजना (1993)

ब) राष्ट्रीय महिला कोष (1993)

क) इंदिरा महिला योजना (1995)

ड) महिला उद्योजक योजना (वितीय योजना आणि बाजारपेठ योजना)

अ) <u>महिला समृद्धी योजना</u> - **(1993)**

महिला समृद्धी योजनेची सुरवात भारतात 1993 साली झाली. शासनाने महिलांमध्ये बचत प्रवृत्ती वाढवून उपलब्ध झालेला निधी महिला कल्याणासाठी वापरण्यात यावा या हेतूने ही योजना सुरू केली. या योजनेद्वारे जास्त व्याजदर देवून महिलांची बचत वाढविण्याचा प्रयत्न शासन करते. या योजनेनुसार देशात 1 कोटी 40 लाख खाती उघडण्यात आली असून 150 कोटी रक्कम उभारलेली आहे.

ब) <u>राष्ट्रीय महिला कोष</u> - **(1993)**

राष्ट्रीय महिला कोषाची स्थापना 1993 साली झाली. ज्या स्त्रिया अनौपचारिक व असंघटित क्षेत्रात काम करीत असून गरीब व असहाय्य आहेत त्यांना सहकार्य करण्यासाठी शासनाने राष्ट्रीय महिला कोष स्थापन केला. या योजनेअंतर्गत जवळ जवळ एक लाख महिलांना वित्त पुरवठा केलेला आहे.

क) <u>इंदिरा महिला योजना</u> - **(1995)**

1995 साली शासनाने एकात्मीक विकासाची प्रक्रिया जलद गतीने होण्यासाठी इंदिरा महिला योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत ग्रामीण पातळीवर ग्रामपंचायतीच्या माध्यमाद्वारे सर्व स्तरावर महिलामार्फत योजना रोबवून आणला जाईल. या योजनेनुसार ग्रामीण विकास कार्यक्रमात स्त्रियांचा अधिक सहभाग असेल. या योजनेत स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण (TRYSEM) , ग्रामीण भागातील महिला आणि मुलांचा विकास (DWCRA),एकात्मिक ग्रामीण विकास योजना, जवाहर रोजगार योजना इत्यादींचा समावेश होतो.

ड) <u>महिला उद्योजक योजना</u> -

भारतीय महिलांचा औद्योगिक क्षेत्रात सहभाग वाढविण्याच्या हेतूने केंद्रसरकारने वित्तीय योजना व बाजारपेठ योजना जाहीर केल्या. [9]

**(1) वित्तीय योजना -**

महिला उद्योजकांना प्रकल्प उभारण्यास भांडवल पुरवठा करण्यासाठी केंद्रसरकारने लघुउद्योग विकास बँकेची स्थापना केली. लघुक्षेत्रातील प्रकल्पासाठी एकूण खर्चाच्या 15 टक्के आणि जास्तीत जास्त 10 लाख रूपयापर्यंत भांडवल देण्याची सोय केली. कच्चा मालाची खरेदी, पक्या मालाची विक्री तसेच व्याज सेवा शुल्क यात काही प्रमाणात सवलती देण्याची तरतूद केलेली आहे. राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळ सुद्धा महिला उद्योजकांना अशा सवलती देत असते.

## (2) बाजारपेठ योजना

महिला उद्योजकांनी तसेच महिला विकास महामंडळांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रिची हमी घेऊन बाजारपेठ योजना तयार केली आहे. खादी ग्रामोद्योग महिला विभाग यांना केंद्रसरकारने बाजारपेठा उपलब्ध करून देण्याचे ठरविले आहे. यासंदर्भात केंद्रसरकारने 409 वस्तूची यादी तयार करून त्यांच्या विक्रीची हमी घेतली आहे. सहाजिकच केंद्रसरकारच्या उद्योजक योजनामुळे महिला उद्योजकांची संख्या वाढू शकेल असे वाटते.

केंद्रशासनाने 1987 साली महिलांना रोजगार आणि त्यासंबंधी प्रशिक्षण देण्याच्या योजना सुरू केल्या. शेती, दुग्ध व्यवसाय, मत्स्यपालन, हस्तकला आणि ग्रामोद्योग अशा पारंपारिक व्यवसायांना चालना दिली. या उद्योग व्यवसायांना सहकार्य देवून त्यासंबंधी प्रशिक्षण देण्याच्या योजना सुरू केल्या. उद्योगधंदे, महामंडळे आधुनिक व्यवसाय क्षेत्रे यांना आर्थिक सहाय्य केले. आठव्या पंचवार्षिक योजनेत यासाठी 20 कोटी रूपये खर्च केले. त्याचा फायदा 20 हजार स्त्रियांना झाला. विधवा, परित्यक्ता, आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या, अपंग स्त्रियांना रोजगार प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने 25 कोटी रूपये खर्च केले. याचा फायदा 70 हजार स्त्रियांना झाला. आठव्या पंचवार्षिक योजनेत केंदसरकारने स्त्रियांच्या प्रौढ शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणावर 40 कोटी रूपये खर्च केले. दुर्बल कमकुवत निराधार स्त्रियांना रोजगार पुरविण्याची आणि त्यांच्यासाठी वसतीगृहे बांधून देण्याचे कार्य करण्यासाठी केंद्रसरकारने आतापर्यंत सुमारे 20 कोटी रूपये खर्च केलेले आहेत.

केंद्रसरकारने स्त्रियांच्या सर्वांगिण विकासासाठी राष्ट्रीय महिला साधन केंद्राची निर्मिती केलेली आहे. ती केंद्रे महिला संघटनाना शिक्षण व प्रशिक्षण देतात. त्या केंद्रात प्रशिक्षित झालेल्या स्त्रीया, महिला विषयक ध्येयधोरणे निर्मिती आणि अंमलबजावणी या कार्यामध्ये सहकार्य करतात. 1992 साली भारत सरकारने देशात 21 महिला अभ्यासकेंद्रे आणि 11 स्वतंत्र महिला विभाग विविध विद्यापीठात सुरू केलेले आहेत. विद्यापीठ अनुदान मंडळाकडून महिलांच्या अभ्यास योजनांसाठी प्रत्येक विद्यापीठाला दरवर्षी 90 हजार रूपये आणि महाविद्यालयांना 25 हजार रूपये अनुदान मिळते.

वरील स्त्रीविषयक धोरणे अस्तित्वात असली तरी अनेक अभ्यासातून असे स्पष्ट झालेले आहे की या धोरणांची अपेक्षेप्रमाणे अंमलबजावणी झालेली नाही. स्त्रियांचे सामाजिक आर्थिक प्रश्न काही प्रमाणात सोडविले गेले असले तरी समाधानकारक फलश्रुती झालेली नाही यासाठी भारताच्या संविधानातील मुलभूत हक्क अनुच्छेद 14, 15 व 16, तसेच राज्य धोरणातील निर्देशक अनुच्छेद 38, 39, 39 अ व 42 यांतील उपबंधांची प्रस्थापना व्हावी. स्त्रियांच्या सामाजिक प्रतिष्ठेमध्ये सुधारणा व्हावी, स्त्रियांना अपायकारक असणाऱ्या प्रथांचा प्रतिबंध व्हावा. स्त्रीविषयक कायद्यांची अंमलबजावणी योग्य रीतीने व्हावी यासाठी महिला आयोग अस्तित्वात आला.

**राष्ट्रीय महिला आयोग -**

भारत सरकारने स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी अभ्यास करून ध्येयधोरणे ठरविण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोग स्थापन करण्याचा कायदा 1990 साली केला. या कायद्यानुसार 31 जाने 1992 रोजी श्रीमती जयंती पटनायक यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली. राष्ट्रीय महिला आयोगाला पुढील प्रमाणे अधिकार देण्यात आले.

1) भारतीय राज्यघटनेने आणि कायद्यांनी महिलांना दिलेले संरक्षण आणि त्यासंबंधीच्या उपाययोजना तपासून पाहणे आणि त्यासंबंधी सरकारला शिफारशी करणे.

2) महिलांच्या विकासाबाबत घटनेतील कायद्यात दुरूस्ती करण्याबाबत सुचना शिफारशी करणे.

3) महिला संरक्षण कायद्यांची समिक्षा करून त्यातील त्रूटी दूर करण्यासाठी सूचना व शिफारशी करणे.

4) महिलाविषयक कायद्याचे उल्लघंन झाल्यास त्यासंबंधी आलेल्या तक्रारीची नोंद घेणे. तसेच महिलाविषयक ध्येयधोरणाची अंमलबजावणी न झाल्यास त्यासंबंधी विचारविनिमय करून केंद्रसरकारला उपाययोजना सुचविणे.

5) महिलांच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शन शिफारशी करणे.

6) केंद्रसरकार व घटकराज्यसरकार यांच्या महिला विकास योजनाचा आणि कार्यक्रमाचा आढावा घेणे.

7) राष्ट्रीय महिला आयोगाने केंद्रसरकार किंवा घटकराज्ये यांना विचारणा केल्यास त्यासंबंधी माहिती पुरविणे बंधनकारक असते. राष्ट्रीय महिला आयोगाने वेळोवेळी परिषदा, चर्चासत्रे व कार्यशाळा भरवून महिलांच्या समस्येविषयी सूचना व शिफारशी केंद्रशासनाकडे करणे अपेक्षित असते. राष्ट्रीय महिला आयोगाच्या निर्मितीनंतर महाराष्ट्र, पं. बंगाल आणि ओरिसा या घटक राज्यात राज्य महिला आयोगाची स्थापना झाली. तसेच आंध्र प्रदेश, गोवा, गुजरात, हरियाणा, जम्मू काश्मिर, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, पंजाब, तामिळनाडू उत्तरप्रदेश, प.बंगाल, चंदिगड, केंद्रशासित प्रवेश येथे महिला विकास मंडळाची स्थापना झाली.

गेल्या 50 वर्षात स्थापन झालेल्या आणि कार्यरत असलेल्या या संघटनाचे कार्य तसेच शासकीय पातळीवरून राबविल्या गेलेल्या योजना आणि कार्यक्रम यांचा स्थूलमानाने विचार केला असता असे दिसून येते की स्त्रियांच्या उन्नतीविषयी, त्यांच्या राजकीय सहभागाविषयी फारशी प्रगती झालेली नाही महिला विषयक योजनां धोरणे आणि कार्यक्रम यांचा केवळ आभास निर्माण केलेला आहे. स्त्रियांचा सामाजिक दर्जा राजकीय सहभाग याविषयी सर्वच राजकीय पक्ष घोषणा देताना आणि अश्वासने देताना दिसतात. निवडणुकीच्या काळात हे राजकीय पक्ष महिला संघटनाचा पाठिंबा मिळवतात. परंतु प्रत्यक्षात सत्तेवर असणारे आणि नसणारे सर्वच राजकीय पक्ष स्त्रियांना केवळ सहानुभूती दाखविण्यापलिकडे काहीही करीत नसलेले दिसते. तेव्हा केवळ या राजकीय पक्षांच्या पोकळ अश्वासनावर अवलंबून राहून चालणार नाही. स्त्रियांच्या उन्नतीसाठी त्यांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी धोरणात्मक व ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यासाठी कायदे केले पाहिजेत, घटनेत दुरूस्ती केली पाहिजे. 73 वी आणि 74 वी घटनादुरूस्ती झाल्यामुळे स्थानिक पातळीवर स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढलेला आहे. ही घटनादुरूस्ती स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविण्याच्या दृष्टीकोणातून महत्त्वाचे पाऊल आहे. या घटनादुरूस्तीच्या संदर्भात थोडक्यात आढावा घेणे आवश्यक ठरते.

**स्त्रियांच्या प्रतिनिधीत्वासंबंधीचे घटनात्मक बदल :**

भारतीय संसदेत स्त्रियांचे प्रतिनिधीत्व आणि निर्णय निर्धारण प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासाठी घटनात्मक उपाययोजना करणे आवश्यक ठरते. ग्रामीण पातळी पासून ते राष्ट्रीय पातळी पर्यंत महिलांचे प्रतिनिधीत्व वाढविणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थातील स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी 1993 साली 73 वी आणि 74 वी घटनादुरूस्ती संमत करण्यात आली. भारतीय संसदेत आणि सर्व घटकराज्यांच्या विधानसभांत ही घटनादुरूस्ती मंजूर करून महिलांना 33 % आरक्षण देण्यात आले.[10] अहवालानुसार भारतात त्रिस्तरीय पद्धती स्थानिक प्रशासनात स्विकारण्यात आलेली आहे, त्यानुसार ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हापरिषद असे तीन स्तर निर्माण करून राजकीय सत्तेचे लोकशाही विकेंद्रीकरण करण्यात आलेले आहे. पंचायत राज्याचा पहिला प्रयोग राजस्थान मध्ये झाला. त्यानंतर इतर राज्यांतून ही पद्धती स्विकारली, परंतु या स्थानिक प्रशासनात महिलांना फारच कमी प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्यात आले होते. वास्तविक महिलांना पुरूषांच्या बरोबरीने राजकारणात सहभागी करून घेणे आवश्यक आहे. परंतु स्त्रियांना भारतात या पंचायत राज्याच्या प्रशासनात अल्प प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्यात आले. बलवंतराय मेहता समितीने ग्रामपंचायतीवर 2 महिलांची नियुक्ती करण्याची शिफारस केली. महाराष्ट्रात 1961 पासून अशी तरतूद केली होती. त्यानंतर स्त्रियांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी तसेच त्यांच्या उन्नतीसाठी उपाययोजनाची शिफारस करण्यासाठी एक समिती `कमिटी ऑन स्टेटस ऑफ वुमेन` नेमली गेली. या समितीकडून 1974 मध्ये अहवाल सादर करण्यात आला. ज्यामध्ये स्त्रियांच्या राजकीय सहभागाविषयी पंचायती पातळीवर आरक्षण देण्याबाबतची शिफारस करण्यात आली, त्याचा विचार 1988 पर्यंत झाला नाही. 1988 मध्ये राजीव गांधी सरकारने राजकीय संस्थेमध्ये 33 % जागावर स्त्रियांची नेमणूक करावी असे सुचित केले होते, पण महिला संघटनानी हे अमान्य करून नेमणूक करण्याऐवजी स्त्रियांना निवडून द्यावे अशी मागणी केली. त्या आधीच कर्नाटक मध्ये 1983 साली आणि त्यानंतर महाराष्ट्र 1990, केरळ - 1991, पं.बंगाल 1992 आरक्षणाचे तत्व पंचायत व्यवस्थेला लागू करून ग्रामपंचायतीपासून महानगरपालिका पर्यंत स्त्रियांसाठी विविध प्रमाणात जागा आरक्षित ठेवण्यांसाठी राज्यांच्या कायद्यामध्ये सुधारणा करण्यात आली. 73वी आणि 74 वी घटनादुरूस्ती झाल्यामुळे स्थानिक प्रशासनात महिलांचे प्रतिनिधीत्व वाढले गेले. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यामध्ये

एकूण जागांच्या 1/3 जागा महिलांना देण्यात आल्या. मागासवर्गीय जाती जमातीना लोकसंख्येतील त्यांच्या प्रमाणानुसार राखीव जागा ठेवण्यात आल्या. तसेच प्रत्येक पंचायत ही 5 वर्षाच्या मुदतीसाठी असेल आणि तिची मुदत संपण्यापूर्वी नवी पंचायत निवडण्यात येईल पंचायत बरखास्त झाली तर 6 महिन्याच्या आत निवडणूक घेण्यात येईल. पंचायत राज्याच्या सर्व पातळीवर अध्यक्षपदांच्या 1/3 जागा महिलांना देण्यात येतील. मध्यप्रदेश, गुजराथ, केरळ, राजस्थान, महाराष्ट्र अशा क्रमाने सर्व भारतभर हा बदल स्विकारण्यात आलेला आहे.

पुढील आकडेवारीवरून 73 व्या घटनादुरूस्तीनुसार महिलांना 30% प्रतिनिधीत्व कसे प्राप्त होईल. हे दिसून येते.[11]

### (अ) ग्रामपंचायतीमधील महिलांचे प्रतिनिधीत्व

| | | |
|---|---|---|
| 1. | देशातील एकूण ग्रामपंचायती | 2,25,000 |
| 2. | ग्रामपंचायती मधील एकूण सदस्य संख्या (प्रत्येक पंचायतीत 10 सदस्याप्रमाणे) | 22,50,000 |
| 3. | महिला सदस्यांची संख्या | 7,50,000 |
| 4. | मागासवर्गीय जाती जमातीची सदस्य संख्या | 1,50,000 |
| 5. | मागासवर्गीय जाती जमातीमधील स्त्रियांची सदस्यसंख्या | 50,000 |
| 6. | अध्यक्षपदांची एकूण संख्या | 2,25,000 |
| 7. | महिलांसाठी अध्यक्षपदे | 75,000 |

**तालुका पंचायतीमधील महिलांचे प्रतिनिधीत्व**

| | | |
|---|---|---|
| 1. | देशातील तालुका पंचायतीची संख्या | 5,100 |
| 2. | तालुकापंचायतमधील एकुण सदस्य संख्या प्रत्येक 10 च्या प्रमाणात | 51,000 |
| 3. | महिलांची एकूण सदस्य संख्या | 17,000 |
| 4. | अध्यक्षपदांची एकूण सदस्य संख्या | 5,100 |
| 5. | महिलांची अध्यक्षपदे | 1,700 |

**क) जिल्हा परिषदांतील महिलांचे प्रतिनिधीत्व**

| | | |
|---|---|---|
| 1. | देशातील एकूण जिल्हा परिषदा | 475 |
| 2. | जिल्हा परिषदेतील एकूण सदस्यसंख्या | 4,750 |
| 3. | महिलांची एकूण सदस्यसंख्या | 1583 |
| 4. | जिल्हा परिषदेच्या अध्यांची संख्या | 475 |
| 5. | जिल्हा परिषदेतील महिला अध्यक्षपदे | 158 |

1993 ते 1995 या काळात कर्नाटक, पंजाब, पं.बंगाल, मध्यप्रदेश आणि राजस्थान या राज्यांत झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत महिलांना प्रतिनिधित्व कसे प्राप्त झाले ते पुढील तक्त्यावरून समजून येते.

**ग्रामपंचायतीमधील महिलांची सदस्य संख्या**

| अ.क्र. | राज्य | वर्ष | ग्रामपंचायतींची संख्या | एकूण सदस्य संख्या | महिला प्रतिनिधींची संख्या व टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | कर्नाटक | 1993 | 5641 | 80627 | 37689(46.74%) |
| 2. | पंजाब | 1993 | 11596 | 60584 | 8776(14.49%) |
| 3. | प.बंगाल | 1993 | 3223 | 61011 | 21489(35.22) |
| 4. | मध्यप्रदेश | 1994 | 30922 | 443429 | 147809(33.33) |
| 5. | राजस्थान | 1995 | 9189 | 103712 | 36.722(35.4) |

पंचायत समितीमधील महिलांची सदस्य संख्या

| अ.क्र. | राज्य | वर्ष | पंचायत समित्यांची संख्या | एकूण सदस्य संख्या | महिला प्रतिनिधींची संख्या व टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | कर्नाटक | 1993 | 175 | 3340 | 1343 (40.21) |
| 2. | पंजाब | 1993 | 136 | 24024 | 8222(34.22) |
| 3. | प.बंगाल | 1993 | 328 | 9453 | 3182(33.66) |
| 4. | मध्यप्रदेश | 1994 | 459 | 9097 | 2991(32.88) |
| 5. | राजस्थान | 1995 | 237 | 5231 | 1738(33.23) |

जिल्हा परिषदांमधील महिलांचे प्रतिनिधित्व

| अ.क्र. | राज्य | वर्ष | जिल्हा परिषदांमधील | एकूण सदस्य संख्या | महिला प्रतिनिधींची संख्या व टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | कर्नाटक | 1993 | 20 | 919 | 335(36.41) |
| 2. | पंजाब | 1993 | 14 | 273 | 89(32.60) |
| 3. | प.बंगाल | 1993 | 16 | 656 | 224(34.15) |
| 4. | मध्यप्रदेश | 1994 | 45 | 942 | 315(33.44) |
| 5. | राजस्थान | 1995 | 31 | 997 | 331(33.20) |

73 आणि 74 व्या घटनादुरूस्तीच्या आधारे ग्रामीण व शहरी भागातलया सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांसाठी 1/3 आरक्षण सक्तीचे केल्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किमान 1 लाख स्त्रिया सहभागी झालेल्या आहेत, तर संपूर्ण देशात किमान 10 लाख स्त्रिया वेगवेगळी पदे व जबाबदाऱ्या सांभाळत आहेत. विविध घटकराज्यांच्या पंचायतराज्याच्या स्थानिक संस्थातील स्त्रियांचे प्रतिनिधित्व पाहिले असता कर्नाटक राज्यात सर्वात जास्त महिलांना प्रतिनिधित्व मिळालेले दिसते. [12] ग्रामपंचायतीमध्ये 44.74%, तालुका पंचायतीमध्ये 40.21%, तर जिल्हापरिषदांमध्ये 36.41% महिलांना प्रतिनिधित्व मिळालेले आहे. पं.बंगाल, मध्यप्रदेश आणि राज्यस्थानमध्ये 30 ते 35 टक्के महिलांना पंचायत राज्यात प्रतिनिधित्व मिळालेले आहे; परंतु पंजाब राज्यातील ग्रामपंचायतीच्या राजकारणात महिलांना 14.49% जागा मिळालेल्या दिसतात.

73 व्या घटनादुरूस्तीमुळे पंचायत राज्यात स्थानिक संस्थामध्ये महिलांना 33% जागा आरक्षित केल्यामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग वाढलेला आहे. अशाच प्रकारे संसदेत स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांना 33% जागा आरक्षित करण्याचा प्रयत्न 1996 पासून सुरू झाला आहे.

भारतीय राज्यघटनेत 81 वी घटनादुरूस्ती करून लोकसभा आणि विधानसभेमध्ये 33% जागा राखीव ठेवण्यासंबंधीची आश्वासन सर्व राजकीय पक्षांनी 1996 च्या निवडणुकीत आपापल्या जाहीरनाम्यात दिली होती. परंतु गेल्या दोन वर्षात आघाडी सरकारचा प्रयोग देशात सुरू झाला आहे. कोणताच राजकीय पक्ष हे दुरूस्ती विधेयक संमत करून घेण्याच्या बाबतीत फारसा उत्साही असलेला दिसत नाही. त्यामुळे गेली दोन वर्षे हे विधेयक संमत न होता रेंगाळत पडलेले आहे. 81 वी घटनादुरूस्ती ही लोकसभा व घटकराज्यांच्या विधानसभांत स्त्री प्रतिनिधीत्व वाढविण्याच्या दृष्टीकोणातून महत्वाचे व दुरगामी पाऊल ठरते. 1975 सालातील महिला संघटनाच्या उद्देशांचा रोख महिला कल्याणाकडून महिला विकासाकडे वळला, 1975 साली बिजिंग येथे तो महिला विकासाकडून महिलांच्या सशक्तीकरणापर्यंत पोहचला. बिजिंग येथे भारत सरकारच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना आरक्षण देण्यात आलेल्या तरतुदीबद्दल कौतुक करण्यात आले आणि अशाच प्रकारचे आरक्षण लोकनियुक्त संस्थामध्ये ठेवण्यात यावे अशी शिफारस बिजिंग येथे मान्य करण्यात आली आणि ही शिफारस अंमलात आणण्यात भारत सरकार वचनबध्द राहिले. महिला सशक्तीकरणाच्या उद्देशाने स्त्री चळवळीने लोकसभा व विधानसभेत आरक्षणाची मागणी केली. 1996 च्या लोकसभेच्या निवडणुकी दरम्यान ही मागणी करण्यात आल्यामुळे कॉंग्रेस, भाजप, जनतादल, समाजवादी पक्ष इत्यादीनी आपापल्या जाहिरनाम्यात स्त्रियांना लोकसभा-विधानसभेत 33% जागा आरक्षित ठेवण्यासाठी घटनादुरूस्ती करण्याचे आश्वासन दिले. जाहिरनाम्यात ही मागणी असताना सुद्धा सर्व राजकीय पक्षांच्या स्त्री उमेदवारांची संख्या पाहिल्यास महिलांसाठी आरक्षण किती आवश्यक आहे हे लक्षात येते. जुलै 1996 मध्ये संयुक्त आघाडी सरकारने आपला किमान समान कार्यक्रम जाहीर करून `सामाजिक न्याय` या अंतर्गत संसद आणि राज्यविधीमंडळामध्ये 1/3 जागा स्त्रियांसाठी आरक्षित केल्या जातील असे स्पष्ट नमूद केले.

**81 वी घटनादुरूस्ती महिला विधेयक :**

पंतप्रधान देवेगौडा यांच्या कारकिर्दीत 12 सप्टेंबर 1996 रोजी महिलांच्या 33% आरक्षाणासंबंधीचे 81 व्या घटना दुरूस्तीचे विधेयक लोकसभेत मांडले. या महिला विधयेकात पुढील तरतुदी करण्यात आलेल्या होत्या.[13]

- लोकसभा आणि घटकराज्यांच्या विधानसभा यात महिलांसाठी 33% जागा आरक्षित करण्यात येतील.
- महिला प्रतिनिधित्वाच्या 33% जागापैकी वर्गीकृत जाती, जमातीच्या स्त्रियांसाठी 1/3 जागा आरक्षित करण्यात येतील.
- लोकसभेच्या किंवा विधानसभेच्या बरखास्तीनंतर लगेच हे संमत झालेले विधेयक स्विकारण्यात येईल.
- महिलांच्या 181 आरक्षित जागा चक्रगतीने फिरत्या राहतील.
- ज्या राज्यात किंवा केंद्रशासित प्रदेशात तीन पेक्षा कमी प्रतिनिधी असतील तेथे हे विधेयक लागू केले जाणार नाही. त्यामुळे अशा 10 राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना ही घटनादुरूस्ती लागू होणार नाही.

13 सप्टेंबर 1996 रोजी हे घटनादुरूस्ती विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या **गीता मुखर्जी** यांच्या नेतृत्वाखाली राज्यसभा व लोकसभा यामधील 29 खासदारांची एक समिती नेमण्यात आली. या समितीमध्ये मार्गरिट अल्वा (काँग्रेस), मालती शर्मा (भाजप), जयंत मल्होत्रा (स्वतंत्र), जी.व्ही.प्रसाद (भाकप), रेणुका चौधरी (तेलगु देसम), शरद पवार (काँग्रेस), कर्नल राम, उमा भारती (भाजप), गिरिजा व्यास, विजय भास्कर रेड्डी (काँग्रेस), सुरेश प्रभु (शिवसेना), नितिश कुमार (समता पक्ष), रमाकांत खलप (म.गो.प.), सुरजित सिंग बर्नाला (अकाली दल) इत्यादी सदस्य होते.[14] या समितीने मूळ विधेकाचा अभ्यास करून आणि निवडक विविध मते मांडून पुढील शिफारशी केल्या.

1) हे आरक्षण 15 वर्षासाठी मर्यादित ठेवावे व त्यानंतर त्याचा सविस्तर आढावा घ्यावा.
2) आरक्षित जागा दर 5 वर्षांनी फिरत्या ठेवण्यात याव्यात म्हणजे 15 वर्षात सर्व जागा आरक्षित होऊन जातील.
3) तीन पेक्षा कमी असलेल्या जागांमध्ये प्रत्येकावर एकदा आरक्षण असावे.

हिवाळी अधिवेशनात महिला आरक्षण विधेयक मंजूर करावे अशी शिफारस या निवड मंडळाने केली.

त्याप्रमाणे 9 डिसेंबर 1996 रोजी गीता मुखर्जी यांनी अध्यक्ष संगमा यांना अहवाल सादर केला. पावसाळी अधिवेशनात विधेयकात बदल सुचविल्यामुळे मंत्रीमंडळाची मंजूरी आवश्यक असल्याच्या सबबी खाली देवेगौडांनी या विधेयकाची चालढकल केली. 31 मार्च 1997 रोजी काँग्रेसने संयुक्त आघाडी सरकारचा पाठिंबा काढून घेतल्यामुळे देवेगौडा सरकार कोसळले आणि इंद्रकुमार गुजराल यांच्या नेतृत्वाखाली सरकार पुन्हा स्थापन झाले. आपल्या भाषणात गुजराल यांनी या विधेयकाचा सकारात्मक उल्लेख केला. महिला संघटनेच्या दबावामुळे परत एकदा संसदेच्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी (16 मे 1997) विधेयक मांडण्याचा निर्णय झाला. गुजराल यांच्याकडून विधेयक मांडण्याचाव प्रयत्न होत असतानाच त्यांच्याच पक्षाचे शरद यादव यांच्याकडून आरक्षण विधेयकाला विरोध व्यक्त करण्यात आला. सभागृहात शिवसेना, मुस्लीम लिग, समता पक्ष, समाजवादी पक्ष, द्रमुक या पक्षाच्या प्रतिनिधींकडून इतका गोंधळ झाला की गुजराल विधेयक मांडू शकले नाहीत. अक्षरश: शेवटच्या दोन मिनिटात हे विधेयक मांडले गेले नी पुढील पावसाळी संसद अधिवेशनात याची चर्चा होईल असे ठरले.

पावसाळी अधिवेशनात या विधेयकावर फारशी चर्चा न होताच हे बाजूला सारले गेले. महिला विधेयकात इतर मागासवर्गीय महिलांच्या प्रतिनिधीत्वाचा मुद्दा उपस्थित करून या विधेयकाच्या चर्चेवर विरोधकांनी बहिष्कार टाकला. महिला विधेयक हिवाळी अधिवेशनात पुन्हा 14 डिसेंबर 1998 रोजी 12 व्या लोकसभेत केंद्रीय कायदामंत्री श्री.एम.थंबीदुराई यांनी मांडले. काँग्रेस, भाजप, डावे पक्ष यांचा या विधेयकास पाठिंबा असून राष्ट्रीय लोकतांत्रिक मोर्चा, बहुजन समाजवादी पक्ष, भारतीय रिपब्लिकन पक्ष या पक्षांनी विधेयकाला विरोध दर्शविला. मागासवर्गीय महिलांना प्रतिनिधीत्व देणारे विधेयक हवे असे त्यांचे मत होते, भाजपचे मदनलाल खुराना (केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री) व श्रीमती उमा भारती यांनी इतर मागासवर्गीय महिलांना प्रतिनिधीत्व मिळण्यासाठी आरक्षण असावे असे मत मांडले. समता पक्षाचे केंद्रीय रेल्वे मंत्री नितीन कुमार यांनी विधेयकाला पाठिंबा दर्शविला, त्यांनी संयुक्त संसदीय समितीचे सदस्य म्हणून या महिला विधेयकाचा अभ्यास केलेला आहे. समता पक्षाचा या विधेयकाला विरोध नाही परंतु या विधेयकात दुरूस्त्या करणे गरजेचे आहे असे मत त्यांनी मांडले.

14 डिसेंबर 1998 रोजी जरी हे विधेयक लोकसभेत मांडले गेले असले तरीही विधेयकाचा अजून खडतर प्रवास संपलेला आहे असे आपण म्हणू शकत नाही. कारण ज्या मुद्याच्या आधारावर विविध पक्ष घटकांकडून विरोध झाला होता आणि महिला आरक्षणाबाबत जे आक्षेप घेतले गेले होते ते आजही त्याच आक्षेपांच्या आधारे या विधेयका संदर्भात वेळकाढूपणाचे साधन म्हणून वापरले जात आहेत. आरक्षणाबाबत जे आक्षेप घेण्यात आले ते कितपत योग्य अयोग्य आहेत याचा विचार झाला पाहिजे.

विधेयक मंजूर करून घेण्यात अडथळे आणण्यासाठी पुढे करण्यात आलेल्या आक्षेपांच्या पैकी पहिला आक्षेप असा आहे की महिलांना महत्त्वाचे हक्क आणि संरक्षण देणारे अनेक कायदे असताना त्या कायदयांच्या अंमलबजावणीसाठी पहिल्यांदा तुम्ही का भांडत नाहीत? याच्या आधीच तुम्ही लोकसभा, विधानसभा मध्ये कशाला जाऊ पाहता? या आक्षेपाला यांनी गीता मुखर्जी यांनी असे उत्तर दिले की, - `कायद्यांच्या अमंलबजावणीसाठी, अधिक खंबीर पणाने आवाज उठविण्यासाठी प्रतिनिधीत्वाची आवश्यकता आहे आणि म्हणून आरक्षण हवे.` दुसरा आक्षेप स्त्रियांच्या क्षमतेविषयी उपस्थित केला गेला आणि महिलांच्या प्रवेशामुळे संसदेच्या कामकाजाचा दर्जा खालावेल अशी टिका करण्यात आली. सध्या लोकसभेमध्ये 83% पुरूष असूनही विद्‌यमान लोकसभेच्या कामाचा दर्जा काय आहे हे आपल्याला दिसतेच आहे. स्त्रियांनी सर्व क्षेत्रांत आपली कामगीरी दाखवून पुरूषाची बरोबरी करीत असताना संसदेच्या कामकाजाबद्दल त्यांची क्षमता कमी लेखणे म्हणजे निव्वळ पुरषीपणा आहे. त्याचप्रमाणे स्त्रियांनी राजकारणात प्रवेश केला तर कुटुंबावर आणि कौटुंबिक जीवनावर वाईट परिणाम होईल, अशीही टिका करण्यात येते. कितीतरी महिलांना त्यांच्या नोकरीसाठी घराबाहेर पडावे लागते, त्यांना नोकरीसाठी घरापासून दूर राहावे लागते, मग राजकारणाबाबतीतच हा आक्षेप का घेतला जातो. तसेच फिरत्या मतदारासंघाकडे दुर्लक्ष होईल कारण आपला मतदारसंघ कधीही आरक्षित होईल या भितीने निवडून आलेले खासदार दुर्लक्ष करतील. याचे उत्तर असे की काही लोकप्रतिनिधीनी आपल्या मतदारसंघात जे बस्तान बांधले आहे त्याला आळा बसेल आणि राजकीय पक्षाच्या आधारावर मतदान न होता व्यक्तीच्या कार्याच्या आधारावर मतदान करण्याची वृत्ती वाढेल. तसेच महिलामध्ये भ्रष्टाचारी वृत्ती वाढेल. स्त्रियांची एकजूट

फोडली जाईल, बिबी, बेटी यांची फौज निर्माण होईल अशी टीका करण्यात आली. परंतु राजकारणात मुले, काका, मामा, पुतणे, भाचे यांच्या प्रतिनिधीत्वाबद्दल टीका केली जात नाही.

शेवटचा आणि अतिशय महत्त्वाचा आक्षेप म्हणजे इतर मागास (OBC) जातीच्या आरक्षणाचा या संदर्भात स्त्री संघटनांकडून विविध उत्तरे देण्यात आली. त्यातील महत्त्वाची म्हणजे ओ.बी.सी.ची मागणी आताच का? तशा प्रकारचे विधेयक घटनादुरूस्तीसाठी का मांडण्यात आले नाही? मंडल आयोगाच्या अंतर्गत सुध्दा अशा प्रकारची मागणी का केली गेली नाही? पंचायतीमध्ये स्त्रियांना आरक्षण देत असताना ओ.बी.सी.साठी उपसूचना का करण्यात आली नाही? आणि ही विभागणी फक्त स्त्रियांनाच लागू का? असे प्रश्न उपस्थित झाले.

उमा भारतीनी उपस्थित केलेला हा मुद्दा शरद यादवांनी पुढे नेवून महिला आरक्षण विधेयकाचा फायदा केवळ उच्च वर्गातील स्त्रियानांच होईल असे मत मांडले, अशा भूमिकेस काही संघटनांनी पाठिंबा दिलेला दिसतो. हा एक अतिशय महत्वाचा मुद्दा उपस्थित करून संपूर्ण स्त्री वर्गात एकजूट आहे की नाही असा एक वाद सुरू असलेला दिसतो. या स्त्री आरक्षणास पाठिंबा देणाऱ्या स्त्री वादयाकडून या ओ.बी.सी. आक्षेपास उत्तर देत असताना ओ.बी.सी.ची.च्या संदर्भात पुढील कारणे दिलेली आहेत.

अ) ओ.बी.सी. समुहाची स्थिती दलित अदिवासी समाजासारखी नाही.

ब) ओ.बी.सी. समुहाकडून या आधी राजकीय संस्थेमध्ये आरक्षणाची मागणी कधीही पुढे आलेली नाही.

क) आज राज्यपातळीवर बिहार मध्ये 324 आमदारांपैकी 162 म्हणजे जवळजवळ 50% सदस्य ओ.बी.सी. समाजातील आहेत. 324 पैकी स्त्रियांची संख्या फक्त 10 आहे. त्यामध्ये 5 ओ.बी.सी., 2 दलित व आदिवासी आणि एकच उच्चवर्णीय महिला आहे.

या आधारावर ओ.बी.सी.ची मागणी आपल्या स्त्री प्रतिनिधी कडून, नाकारल्याचे स्पष्ट होते. पण स्त्रीचे समाजातील स्थान विशेषत: भारताच्या संदर्भात अभ्यासत असताना तीन घटकांच्या आधारावर करणे गरजेचे आहे. लिंग, वर्ग आणि जातीच्या आधारावर स्त्री शोषणाची तीव्रता कमी अधिक

असलेली दिसते. याचा अर्थ सर्व स्त्रियांची पातळी, स्थिती आणि स्थान एक असूच शकत नाही. उच्च वर्गीय , मध्यमवर्गीय आणि दलित शेतमजूर स्त्री यांच्या जीवनविषयक प्रश्नांत निश्चितच फरक आहे. सर्व स्त्रियांचे दु:ख एकच आहे या तर्काच्या आधारावर विचार केल्यास दलित आदिवासी महिलांना का स्वतंत्र आरक्षण देण्याची गरज निर्माण झाली यांचा विचार केल्यास, मग असा प्रश्न उपस्थित होतो की ओ.बी.सी. ना स्वतंत्र आरक्षण नाही? स्त्री वादी दृष्टीकोणातून विचार केल्यास यांची फारकत आपण दोन गटांत करू शकतो. एक गट जो उच्च वर्गीय (श्रेष्ठीजन) जो स्त्री वादी आहे पण शोषित नाही आणि दुसरा गट जो मोठया प्रमाणात आहे, जो शोषित आहे पण स्त्रीवादी नाही. सामाजिक मुल्यांमध्ये संघर्षाच्या माध्यमातून बदल घडवून आणल्याशिवाय कोणतेही कायदे सुधारणावादी व प्रभावी ठरत नाहीत, हे स्त्रीवादी नाकारू शकत नाहीत. सैध्दांतिक पातळीवर जात, वर्गविरहित समाजाची न्याय अपेक्षा असली तरीही भारताच्या राजकीय क्षेत्रात आपल्या सामाजिक मुल्यांचा प्रभाव आपण नाकारू शकत नाही. त्यामुळे यादवांच्याकडून जी मागणी झाली ती जरी राजकीय डावपेचातून मांडण्यात आली असली तरीही विविध जमातींना योग्य ते प्रतिनिधित्व मिळणे म्हणजे लोकशाही होय. स्त्रियांच्याकडून लोकशाही चौकटीत प्रमाणात प्रतिनिधीत्वाची मागणी होत असताना त्यांच्या अंतर्गत असलेल्या घटकांसाठी प्रमाणशीर मागणी झाल्यास हे लोकशाही तत्वाच्या विरोधात नसल्यामुळे हे स्त्रीवादी घटकांना मान्य करावे लागणार आहे. याचा अर्थ स्त्री वादी उद्देशांना बाजूला सारणे असा नाही, पण त्याहूनही अशा प्रकारांनी आजच्या परिस्थितीत अडथळयाच्या स्वरूपात उपस्थित केलेली ओ.बी.सी.ची मागणी मान्य करून विविध स्त्री जमातीमध्ये संवाद साधण्याची संधी प्राप्त करून, संसदेत एक आगळी शक्ती म्हणून त्याचा योग्य तो उपयोग होवू शकतो.

स्त्रियांचे लोकसभा, विधानसभा पातळीवरील आरक्षण संसदेत तसेच निर्णय निर्धार प्रक्रियेत स्त्री-प्रतिनिधीत्व वाढविण्याच्या दृष्टीकोणातून हे केवळ आवश्यकच नसून लिंगदरी कमी करण्यास उपयुक्त ठरते. गेल्या 50 वर्षापासून आतापर्यंत कायदे, सामाजिक आणि आर्थिक सुधारणा या द्वारे स्थानिक स्वराज्य पातळीवर जरी अपेक्षित बदल झाले नसले तरी स्त्रियांची स्थिती निश्चितच बदल होण्याच्या मार्गावर असलेली दिसते.

पंचायत पातळीवर जरी स्त्रियांच्या सहभागाविषयी टिका होत असली तरीही भविष्य काळात अधिक प्रमाणात स्त्रिया सहभागी होऊन अनुभवाच्या आधारावर स्वबळाने स्वत:च्या मनाने निर्णय निर्धार प्रक्रियेत सहभागी होतील हे निश्चितच. स्थानिक स्वराज्य पातळीवर ज्या प्रमाणात लोकसभा आणि विधानसभा पातळीवरच नव्हे तर सर्व स्तरांच्या निर्णय निर्धार प्रक्रियेमध्ये स्त्री-सहभाग वाढविण्याची आवश्यकता व गरज आहे. केवळ आरक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांचे सशक्तीकरण होणे शक्य नाही, हे जरी खरे असले तरीही अनेक सशक्तीकरणाच्या मार्गापैकी आरक्षण हा एक अतिशय महत्त्वाचा मार्ग व माध्यम ठरते. स्त्री प्रतिनिधीत्व वाढविण्याच्या इतर दृष्टीकोणातून शिफारशी करत असताना प्रामुख्याने स्त्रियांच्या राजकीय शिक्षणाच्या दर्जाबद्दल उल्लेख करावा लागतो. शिक्षण हे एक स्त्री मुक्ती आणि स्त्री सशक्तीकरणाचे प्रभावशाली साधन आहे. पण केवळ शिक्षण म्हणून या शिर्षकाखाली परत जर पुरूषप्रधान मुल्यांचा ज्याच्यावर आधारित सध्यपरिस्थितीत अस्तित्वात असणारे लिंगभेद हे आपल्या समाजात प्रस्थापित झालेले आहेत, तीच मुल्ये टिकविण्याच्या दृष्टीकोणातून जर स्त्रियांना शिक्षण देण्यात येत असेल तर या शिक्षणाचा स्त्री उन्नतीसाठी उपयोग होणारच नाही. याचे प्रतिबिंब सुशिक्षित महिलांची जीवन जगण्याची पद्धती आणि पुरूष प्रधान मुल्यांना वास्तविकता, न्याय आणि उपयुक्त वादाच्या आधारावर सुशिक्षित स्त्रियांकडून मान्यता मिळणे हे होय. यावरून आता असलेल्या शिक्षण पद्धती व अभ्यासक्रम हे किती पुरूष प्रधान मुल्यांच्या आधारे करण्यात आलेले आहेत हे स्पष्ट होते. त्यामुळे केवळ राजकारणात स्त्री प्रतिनिधीत्व वाढविण्याच्या दृष्टीकोणातूनच नव्हे, तर स्त्रीला आर्थिक सबल बनविणे या आधारावर शिक्षण पद्धती आणि अभ्यासक्रम राबविणे गरजेचे आहे. राजकारणात स्त्री प्रतिनिधीत्व वाढविण्याच्या दृष्टीकोणातून नागरिकांचे (मतदारांचे) राजकीय शिक्षण होणे गरजेचे आहे असे झाल्यास निवडणुकीतील पैशाचा प्रभाव, बळाची सत्ता आणि बदलती निष्ठा यावर आळा घालता येतो. राजकीय शिक्षण हे राजकीय समाजिकरणाच्या द्वारे प्रभावी होवू शकते. राजकीय समाजिकरणाच्या विविध घटकांपैकी राजकीय पक्ष हा घटक महत्त्वाचा ठरतो. पण भारतातील राजकीय पक्षाकडून हवे तितके आणि हवे त्या प्रमाणात राजकीय समाजीकरणाचे कार्य प्रभावीपणे व जाणीवपूर्वक झालेले नाही. प्रत्येक राजकीय पक्षाला खरोखरच स्त्री प्रतिनिधींना निर्णय निर्धार प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्याचे मान्य असल्यास राजकीय

पक्षाकडून शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध रचनेच्या द्वारे स्त्री प्रतिनिधींना राजकीय शिक्षण व राजकीय समाजीकरणा द्वारे त्याची पात्रता निर्माण करून शकतील.

(Gender Sensitisation) हा शिक्षणाचा एक अविभाज्य घटक असणे गरजेचे आहे. याच्या माध्यमातून रूढ असलेल्या सामाजिक मुल्यांच्या आधारावर लैंगिक भेदभाव स्पष्ट होवू शकतील तसेच अशा शिक्षणातून स्त्रीयां विरूद्धच्या सर्व प्रकारच्या भेदाचे उच्चाटन होण्याच्या दृष्टीकोणातून हे गरजेचे आहे असे शिक्षण शालेय, महाविद्यालयीन, विद्यापीठ पातळीवरून प्रशिक्षणाच्या माध्यमातून देणे शक्य आहे.

प्रशिक्षणाच्या द्वारे राजकारणात स्त्री प्रतिनिधीत्व आणि त्यांचा सहभाग वाढू शकतो. असे जरी सातत्याने मांडण्यात आले असले तरी प्रशिक्षण हे योग्य वेळेस, योग्य ठिकाणी आणि योग्य त्या गटास देणे गरजेचे आहे. तसेच प्रशिक्षणाअंतर्गत एकच विशिष्ट अभ्यासक्रम असणे हे वास्तविक स्वरूपात योग्य नसल्यामुळे त्या त्या गटाच्या गरजेनुसार प्रशिक्षणाचे अभ्यासक्रम व माध्यम निवडणे आवश्यक ठरते. स्त्री प्रशिक्षणाच्या बाबतीत विशेषत: स्थानिक स्वराज्य पातळीवर अशा प्रकारचे `मंडलिक ट्रस्ट` कडून मोठ्या प्रमाणात यशप्राप्त झालेले दिसते. त्यामुळे वरील सुचना लक्षात घेऊन जर प्रशिक्षण राबविले तर निश्चितच स्त्री प्रतिनिधीत्वात वाढ होईल.

स्त्रियांचे राजकीय प्रतिनिधीत्व वाढविल्यास स्त्री सहभाग आताच्या परिस्थितीत वाढतोच असे नाही. स्त्री प्रतिनिधींच्याकडून सहभाग वाढविण्याच्या दृष्टीकोणातून निर्वाचित स्त्रियांना योग्य ते प्रशिक्षण आणि सक्रीय कार्य करण्यास योग्य ती यंत्रणा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. यासाठी विविध शैक्षणिक व्यासपीठांचा वापर होवू शकतो. विद्यापीठे, स्त्री अभ्यासकेंद्रे, तसेच शासनाकडून प्रांत व गटवार गरजेनुसार प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. तसेच आणखी एक महत्त्वाची शिफारस म्हणजे निवडणुक पद्धतीमध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे, ज्यामध्ये निवडणुकीसाठी सार्वजनिक, आर्थिक पाठिंबा तसेच राजकारणात वाढत्या गुन्हेगारीकरणावर आळा घालणे इत्यादी सुधारणाच्या स्वरूपात प्रयत्न होणे गरजेचे आहे. [15]

स्त्री प्रतिनिधीत्व वाढविणे किंवा स्त्रियांचे राजकीय सशक्तीकरण करणे हे वरील दिलेल्या सर्व घटकांवर अवलंबून असते. पण 50 वर्षे स्वातंत्र्य मिळूनही अजूनही पुरूष प्रधान संस्कृतीत, दृष्टीकोणात फारसा बदल झालेला दिसत नाही हे आज महिला आरक्षण विधेयकाला जो विरोध होतो त्या विरोधाच्या आक्षेपांच्या आधारे स्पष्ट होते. त्यामुळे स्त्री आरक्षण, स्त्रियांचे राजकीय समाजीकरण व शिक्षण हे जरी स्त्रियांच्या सशक्तीकरणास कारणीभूत ठरत असले तरीही सद्यस्थितीमध्ये दोन पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे.

1) **रचनात्मक व्यवस्थेत बदल.**

2) **मुलत: मुल्य आणि दृष्टीकोणात बदल.**

या दोन्ही क्षेत्रांत जरी अल्प प्रमाणात बदल झालेले आहेत आणि होतही असतील पण यासाठी मोठ्या प्रमाणात सकारात्मक कार्यशील कार्यक्रम पंचायतपातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत होणे गरजेचे आहे, तसेच स्त्री संघटनाच्या कडून राजकीय जाणीव निर्माण करण्यापासून सक्रिय सहभाग होण्यापर्यंत प्रयत्न होणे आवश्यक आहे. भारतातील अनेक स्त्री संघटना कार्यशील असून त्या त्या प्रदेशप्रांत पातळीवर स्वायत्त रितीने कार्य करीत आहेत. स्त्री संघटनाकडून केवळ सामाजिक संघटनेच्या स्वरूपात स्त्रियाविषयक प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न होत असले तरीही आजच्या 1975 पासून आजपर्यंतच्या अनुभवाच्या आधारे असे स्पष्ट होते की जोपर्यंत या सामाजिक स्त्री संघटनाचा राजकीय स्वरूपात बदल होत नाही तोपर्यंत स्त्री संघटनेचा उद्देश म्हणजेच स्त्री सशक्तीकरण प्राप्त होवू शकत नाही. यादृष्टीकोणातून विविध स्त्रीसंघटनांच्या माध्यमातून एकजुटीने स्त्री संघटनांचे एक जाळे निर्माण करून अंतर्गत पातळीवर समन्वयाच्या आधारावर जाहिरनामा ठरविणे आणि प्रदेश पातळीवर योग्य स्त्री उमेदवारांना पाठिंबा देवून त्यांच्यासाठी प्रचार आणि प्रसार माध्यमातून निवडणुकीच्या वेळेस राजकीय जागृती निर्माण करून स्त्रियांना निर्वाचित करणे शक्य आहे. राजकीय संस्था आणि स्त्री संघटना यांच्या कडून एकात्मक दृष्टीकोणातून कार्य झाल्यास निश्चितच जी राजकारणात लिंगदरी निर्माण झाली आहे ती कमी होवू शकेल. पण सर्वात प्रथम शिक्षणा द्वारे सुचित केल्याप्रमाणे सामाजिक रचनेच्या दृष्टीकोणात आणि सामाजिक मुल्यात बदल होणे आवश्यक आहे आणि त्यासाठी शैक्षणिक व्यवस्था आणि अभ्यासक्रमाद्वारे स्त्री दृष्टीकोणातून प्रयत्न होणे आवश्यक आहे.

## संदर्भ -

1) गर्गे स. मा ; `भारतीय समाज विज्ञान कोश`,

खंड - 4, समाज विज्ञान मंडळ, पुणे.

आवृत्ती पहिली, 1990

पृ. 459

2) किश्वर मधू ; `विमेन मार्जिनल रोल इन पॉलिटिक्स`

पॉलिटिकल सायन्स ॲन्युयल, 1997

दीप ॲन्ड दीप पब्लिकेशन,

न्यु दिल्ली

पृ. 155

3) मोटे कृष्णाबाई ; `स्त्री स्वातंत्र्याची वाटचाल`

`भारतीय स्त्री`,

संपादक - श्री. ना. बनहट्टी, मो. शा. शहाणे.

हिंगणे स्त्री शिक्षणसंस्था, पुणे.1967

पृ. 137

4) गर्गे स. मा ; `भारतीय समाज विज्ञान कोश`,

खंड - 5, समाज विज्ञान मंडळ, पुणे.

आवृत्ती पहिली, 1997

पृ. 144

5) भागवत कमल, गाडगीळ मालती, केळकर शांता, तुळपुळे मालिनी, रानडे शांता; `भारतीय स्त्री चळवळीची वाटचाल`,

`स्त्री चळवळीची वाटचाल`

प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे.

1985, पृ. 28

6) स्वामी शिवतत्त्वानंद ; `हिंदू स्त्री आजची आणि उद्याची`
प्राध्यापक विश्व - महिला प्राध्यापक परिषद विशेषांक,
10 डिसे. 1995, पुणे.
पृ. 10.

7) भागवत कमल, गाडगीळ मालती, केळकर शांता, रणदिवे कुसुम, तुळपुळे मालिनी, रानडे शांता ;
`भारतीय स्त्री चळवळीची वाटचाल.`
`स्त्री चळवळीची वाटचाल`
प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे.
1985
पृ. 172

8) Fourth World Confernce on women,
Beijing 1995, Country Report Government.
Dept. of women and Child Development.
New Delhi, 1995
p. 24, 25

9) डॉ. पाटील शिवाजी,
`भारतातील महिला आर्थिक विकास नीती`
योजना ; अंक 11, जून 1998.
संपादक - एन. एन. शर्मा,
पृ. 4, 5.

10) Fourth World Confernce on women,
Beijing 1995, Country Report Government.
Dept. of women and Child Development.
New Delhi, 1995
p. 24, 25

11) Ibid, p. 71

12) Ibid, p. 72

13) India Today; 15 oct. 1996.
Editor- Aroon Purie

14) Inidan Express, 19 oct. 1996.
Editor - Vivek Goenka

15) Nanivadekar Medha; Reservation for Women
Economic and Polictical Weekly;
Vol - xxx III, No. 28
Editor - sachin chandhari,
July - 98, p. 1818, 1819.

LIBRARY